● शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक १८९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## प्रस्तावित कत्तलखाण्याचा निर्णय रद्द!

**जालना । प्रतिनिधी -** संतांची भूमी आणि अहिंसेचे प्रतीक असलेल्या जालना शहरात प्रस्तावित कत्तलखान्याच्या उभारणीविरोधात सकल जैन समाजासह हिंदू महासभेचे प्रदेश संघटन मंत्री हिंदुशौर्य धनसिंह सुर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली लोकक्षोभ उफाळून आला. आणि बुधवार (दि. ५) रोजी या निर्णयाविरोधात आवाज उठवत आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आल्यानंतर पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांनी जालना येथे कत्तलखाना उभारण्याचा निर्णय तात्काळ रद्द करत, ही बाब त्यांच्या स्वीय सहाय्यक मंदार वैद्य यांच्या मार्फत श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाचे अध्यक्ष सुदेश सकलेचा यांना कळविली आहे. अहिंसावादी सकल जैन समाजाच्या विरोधामुळे अखेर शासनाला हा निर्णय मागे घ्यावा लागला असून, प्रस्तावित कत्तलखान्याचा निर्णय रद्द करण्यात आल्याने समाज बांधवांनी आनंद व्यक्त केला आहे.

जालना हे केवळ ऐतिहासिक आणि औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर नसून, ते संतांची भूमी आणि अहिंसेच्या तत्त्वांचा प्रचार करणारे पवित्र तीर्थक्षेत्र आहे. पूज्य गणेशलालजी महाराज यांची ही निर्वाणभूमी आहे तसेच आचार्य श्री विरागसागर महाराजांचे 'श्री विराग अक्षय समाधी तीर्थस्थळ' येथे स्थित आहे. दरवर्षी हजारो श्रद्धाळू जालना येथे दर्शनासाठी येतात. अहिंसा आणि जीवदयेच्या प्रचारासाठी या भूमीने अनमोल योगदान दिले आहे. जालन्यात अनेक गोशाळा कार्यरत असून, हजारो गायींचे संगोपन येथे होत आहे. अशा या पवित्र भूम ीवर कत्तलखाना उभारला जाणे अत्यंत वेदनादायी असल्याचे जैन समाजाने स्पष्ट केले होते. प्रस्तावित कत्तलखान्याला विरोध करत सकल जैन सम ाजाने आक्रमक भूमिका घेतली होती. या संदर्भात अतिरिक्त जिल्हाधिकारी श्रीमती रिताजी मैत्रेवार यांच्यामार्फत पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांना निवेदन देण्यात आले. मैत्रेवार यांनी हे निवेदन पालकमंत्र्यांपर्यंत पोहोचवले आणि समाजाच्या संतप्त भावना त्यांच्यापर्यंत व्यक्त पोहचविल्या व त्यासोबत चर्चा केली यामुळे पालकमंत्र्यांनी त्याची दखल घेत हा निर्णय रद्द करण्याचा आदेश दिला. त्यांचे स्वीय सहाय्यक मंदार वैद्य यांनी जैन श्रावक अध्यक्ष सुदेशकुमार सकलेचा यांच्याशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून हा निर्णय कळवला.

या निर्णयामुळे सकल जैन समाजासह जालन्यातील नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. सरकारच्या माघारीमुळे लोकशक्तीच्या प्रभावाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. जालना जिल्ह्यातील अहिंसाप्रिय जनतेने मोठा विजय मिळवला आहे. जालना शहराच्या धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्वामुळे हा निर्णय फक्त एका समाजाचा नव्हता, तर संपूर्ण जनतेच्या श्रद्धेचा विषय होता. हा विजय केवळ जैन समाजाचा नसून, जीवदयेवर विश्वास ठेवणार्या प्रत्येक नागरिकाचा आहे.

## शेतकऱ्यांनी रेशीम शेती करून समृध्द व्हावे - जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

### गावातील ७० शेतकऱ्यांनी केली नोंदणी




**जालना । प्रतिनिधी -** रेशीम शेती उद्योगाद्वारे शेतकऱ्यांना शाश्वत तसेच अधिक उत्पादन मिळत असून जालना जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तुती लागवड करून आपला विकास साधावा. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी रेशीम शेती करुन समृध्द व्हावे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

रेशीम कोषांना चांगले दर मि ळण्यासाठी उपलब्ध करून देणार ड्रायर तसेच रेशीम धागा निर्मितीचे लहान युनिट दि. ५ फेब्रुवारी २०२५ रोजी अंबड तालुक्यातील वडीकाळे येथे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या प्रमुख उपस्थितीत महारेशीम अभियान-२५ अंतर्गत शेतकरी म ेळावा घेण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमासाठी उपविभागीय अधिकारी पुलकीत सिंह, तहसीलदार विजय चव्हाण, मंडळ कृषी अधिकारी एस.डी.पालवे, कृषी पर्यवेक्षक के.पी.कोकाटे, कृषी सहाय्यक जी. बी. उंडे, जिल्हा रेशीम कार्यालयाचे वरीष्ठ क्षेत्र सहाय्यक शरद जगताप, सरपंच श्रीमती शिवनंदा भगवान ढेबे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ म्हणाले, पावसाळ्यात रेशीम कोषांना २५० ते ३५० रुपये प्रति किलो दर प्राप्त होतो तर नोव्हेंबर पासून पुढील कालावधीत रेशीम कोषांना ५०० ते ७०० रुपये प्रति किलो असा वाढीव दर मिळतो. शेतकरी नैसर्गिक रित्या रेशीम कोषांची साठवण करु शकत नाही, परंतु रेशीम कोषांना उष्णता देऊन सुकविल्यास दीर्घ काळ साठविता येतात, यामुळे कमी दर असताना शेतकऱ्यांनी आपले कोष ड्राय करून साठवावे व चांगले दर मिळत असताना त्याची विक्री करावी. या करीता शेतकरी गटास जिल्हा प्रशासनाव्दारे हॉट एअर ड्रायर समुहात देण्यात येईल तसेच ज्या शेतकऱ्यांना स्वतः चे कोषांपासुन त्यांचे गावातच रेशीम धागा बनवायचा आहे अशा गटास रेशीम धागा निर्मितीचे लहान मशीन उपलब्ध करून देण्यात येईल. जालना जिल्ह्यात रेशीम उद्योगातील सर्व प्रक्रियांची उभारणी करून हातम ागावर रेशीम वस्त्रे तयार करण्याचे प्रशिक्षण केंद्राची उभारणी करण्यात येत आहे. सर्व प्रक्रियांची उभारणी जालना जिल्ह्यात झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या पान २ वर

## बातम्या नीट द्या अन्यथा उडवू टाकू - अजित पवारांची मिश्कील टिप्पणी

**पुणे -** पिंपरी चिंचवडमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन झाले. यानंतर त्यांनी चाकणच्या निबे उद्योग समूहाला भेट दिली होती. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री पवार यांनी हातामध्ये एके ४७ बंदूका घेतल्याचे पाहायला मिळाले. यावेळी मुख्यमंत्री फडणवसी यांनी नेम लावण्याचा प्रयत्न केला. तर अजित पवारांनी उपस्थित पत्रकारांवर बंदूक रोखत महायुतीच्या बातम्या नीट द्या नाहीतर बघा, असे विधान केले अन् उपस्थितांमध्य एकच हशा पिकला.

## बहारदार त्रैभाषिक गझल मुशायरा; रसिक मंत्रमुग्ध




**जालना । प्रतिनिधी -** 'मी शब्दांना असे घुसळले की, रक्तामधुनी काव्य उसळले
बहुदा तिचीच चाहूल आहे, हवेत अत्तर कसे मिसळले.
गझलेच्या वस्तीत राहतो, मी माझ्याच मस्तीत राहतो,
आज काल मी सुगंध होऊन, रसिकाच्या दस्तीत राहतो.' असे म्हणत प्रसिद्ध गझलकार योगीराज माने यांनी रसिकांना मंत्रमुग्ध केले.

जेईएस महाविद्यालयाचा मराठी विभाग तसेच भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद, शाखा जालना यांच्या वतीने आयोजित केलेल्या सातव्या त्रैभाषिक गझल मुशायर्या मध्ये उपस्थित गझलकारांनी एकापेक्षा एक सरस गझला सादर केल्या.

मुशायऱ्याचे उद्घाटन छत्रपती संभाजीनगर येथील मौलाना आझाद महाविद्यालयाचे प्राचार्य आणि माजी अधिष्ठाता डॉ. मजहर फारुकी यांच्या हस्ते झाले. यावेळी अध्यक्षस्थानी प्रसिद्ध गझलकार डॉ. इक्बाल मिन्ने होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या सदस्या डॉ. अपर्णा पाटील, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, परिषदेचे राज्याध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या गझल मुशायर्यात राजेंद्र अत्रे, योगिराज माने, युवराज नळे, जमाल चिस्ती, भागवत घेवारे आणि सुनीता कपाळे या नामवंत गझलकारांनी आपल्या रचना सादर केल्या. गझल मुशायर्याचे अध्यक्ष डॉ. इक्बाल मिन्ने यांनी 'सबको सबकी हर खबर चाहिए , लोग चलती फिरती अखबार क्यूँ है ।'अध्यक्ष स्थानावरून याप्रमाणे एकापेक्षा एक सरस गझला सादर करीत रसिकांना खिळवून ठेवले.

धाराशिव येथून सहभागी झालेल्या भागवत घेवारे यांच्या 'पायाखालची घेतील काढून तुझ्या, ते वीट विठ्ठला, जरी वाटले भोळेभाळे, लक्ष ठेव तू नीट विठ्ठला. या भावगर्भ मराठी गझलेने गझल मुशायऱ्याचा प्रारंभ झाला.

'गुरू कोण असतो मुक्या पाखरांना, तरी जाहली ती कलाकार आता'. या छ. संभाजीनगर येथील गझलकारा सुनीता कपाळे यांनी तरन्नूम मध्ये सादर केलेल्या गझलेने श्रोत्यांना अंतर्मुख केले. तर 'मुह से निवाला न छीनो गरीबों के, इसी कारण फसाद होना है मंजूर।
बूढों के कुछ हाल देखकर 'रौशन', बिलकुल बेऔलाद होना है मंजूर।' या हिंदी गझलेतून

धाराशिव येथील युवराज नळे यांनी वर्तमान परिस्थितीवर भाष्य केले. असेच वास्तव भाष्य छ. संभाजीनगर येथील उर्दू गझलकार जमाल चिस्ती यांनी 'न डालो यु ही कुछ शक की निगाहे, मेरे झोली मे कोई बम नही है ।या दमदार गझलेतून केले.

'इथे ना तोतयी तत्वे, इथे ना बेगडी वस्त्रे, तरीही वीज सत्त्याची, उराशी लावतो आम्ही'. पान २ वर

## कबड्डी असोसिएशनच्यावतीने निवड चाचणी स्पर्धा

**जालना । प्रतिनिधी -** जालना जिल्हा कबड्डी असोसिएशनच्यावतीने निवड चाचणी स्पर्धेसाठी राज्य किशोर किशोरी गटच्या (म ुले, मुली) स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.

या निवड चाचणी स्पर्धे साठी दि.१ जानेवारी २००९ नंतर जन्मलेल्या खेळाडूंनाच सहभागी होता येणार आहे. हा निकष पूर्ण करु शकरार्या मुलां, मुलीच या स्पर्धेसाठी पात्र ठरणार आहेत, याची नोंद प्रत्येक खेळाडूने घ्यावी, या स्पर्धेसाठी आधार काड, जन्माचा दाखला (शाळेचा) ही कागदपत्रे सुध्दा आवश्यक असून ही कागदपत्रे जमा करणार्या खेळाडूंनाच या निवड चाचणीत सहभागी होता होणार आहे. सहभागी होऊ इच्छणाऱ्या सर्व संघाच्या व्यवस्थापकांनी आपल्या संघाची नोंदणी दि. ८ फेब्रुंवारी २०२५ पर्यंत राहुल वाहुळे - ९८२३५ ५५८०२, बाबासाहेब मंडाळे- ९८२३६ ६१८६१, रामदास निहाळ- ९४२१६ ८४३९३ यांच्याशी संपर्क साधावा. ही निवड चाचणी स्पर्धा जिल्हा परिषद शाळा, पिरपिंपळगांव (श्रीक्षेत्र राजूर रोड) ता. जालना येथे होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होऊ पान २ वर

## युवा आदर्श

### नाती ...

सतावे वृध्दापकाळ
सैल पडतात नाती
मुले बाळी दुरावती
रुंजी घाले नातनाती
दुर्धर आजार अनेक
जन्मांतरीचे सोबती
मृत्यूला बिलगे पर्यंत
राही एकनिष्ठ संगती
रक्ताची नाती निसटे
स्पष्टदिसते विसंगती
ऐश्वर्य जवळ असता
कशा रंगतात पंगती
वाढा मिठान्नं पानांत
गप्पाटप्पा त्या दंगती
हातांमधे दानत शक्ती
आशीर्वाद देण्यापुरती
आधार शोधण्यास्तव
चिमणी पोरे बिलगती
होता स्वयंभू सशक्त
नकळत ती विलगती
रुळासहीत गाडीवळे
करो पहा सहजगती
हरित पीत पाने भिन्न
नियम हाच रे जगती
गरज आता संपलेली
केली जाते निनंगती
विसरून जाती लोक
होती जशी अस्तंगती

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

### सदस्यता नोंदणी व सक्रिय सदस्यतेसंदर्भात परतुर व मंठा येथे आ. लोणीकर यांनी पदाधिकाऱ्यांची घेतली कार्यशाळा

## अभियानाच्या माध्यमातून घराघरापर्यंत पोहोचा - आ. लोणीकर

**परतूर । प्रतिनिधी -** भारतीय जनता पार्टी हा जगातील सर्वात मोठा सदस्य संख्या असलेला पक्ष असून, पक्षाची पाळे मुळे आणखी घराघरापर्यंत रुजवण्यासाठी प्रत्येक बूथवर किमान ३०० सदस्य करण्याचे आवाहन माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी केले

सक्रिय सदस्य होण्याच्या पात्रतेसाठी किमान १०० सदस्य करणे आवश्यक असून, त्यासाठी बूथ प्रमुखांनी व गावातील प्रमुख पदाधिकाऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत नोंदणी करावी असे यावेळी बोलताना ते म्हणाले

कार्यकर्त्यांच्या बळावरच पक्षाने एवढ्या मोठ्या कशाला गवसणी घातलेली असून, हे यश अविरत टिकवण्यासाठी, केंद्रातील मोदी सरकार राज्यातील फडणवीस सरकारने घेतलेले सर्वसाम ान्य जनतेसाठीची निर्णय वैयक्तिक लाभा च्या योजना घराघरापर्यंत पोहोचून भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाखालील केंद्रातील व राज्यातील सरकार हे खऱ्या अर्थाने जनकल्याणकारी सरकार असून आपण घराघरातील लाडक्या बहिणी, युवक, विविध घटकांपर्यंत पोहोचून सदस्यता नोंदणी केल्यास खऱ्या अर्थाने आपल्याला मिळालेली टार्गे ट आपण सहज पार करूत असेही यावेळी बोलताना ते म्हणाले

पुढे ते म्हणाले की, भारतीय जनता पार्टीच्या वाटचालीत अनेकांचा सिंहाचा वाटा असून लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी, अमित शहा, जेपी नड्डा देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वामध्ये भारतीय जनता पार्टी खऱ्या अर्थाने महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वात बलवान पक्ष असून या बलवान पक्षाचे आपण कार्यकर्ते आहोत त्यामुळे आपण स्वतः ला झोकून देऊन काम केल्यास निश्चित पणे यश मिळेल असेही ते म्हणाले येणाऱ्या निवडणुका या कार्यकर्त्यांच्या निवडणुका असून, त्या जिंकण्याची शिवधनुष्य आपल्या सर्वांना मिळून उचलायची असून ते यशस्वी करून दाखवायचे आहे त्यासाठी सदस्यता नोंदणीच्या माध्यमातून घराघरापर्यंत संपर्क करण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे यावेळी बोलताना ते म्हणाले



यावेळी संदीप गोरे शत्रुघ्न कणसे, रमेश भापकर, संपत टकले, सतीशराव निर्वळ भगवान मोरे, पंजाबराव बोराडे वैजनाथ बोराडे नितीन राठोड अजय अवचार कैलास बोराडे नागेश घारे संभाजी वारे , राजेश मोरे तुकाराम सोळंके, विकास सूर्यवंशी माणिकराव वाघमारे, विलास घोडके सिताराम राठोड नितीन जोगदंड अमोल मोरे रमेश आढाव जिजाबाई जाधव ज्ञानेश्वर शेजुळ पद्माकर कवडे, सिद्धेश्वर केकान उद्धव गुंजाळ गजानन लोणीकर, नितीन सरकटे दत्ता खराबे, रामकिसन बोडके कैलास चव्हाण वसंत बागल मुस्तफा पठाण मधुकर मोरे, बाबाराव थोरात, माजी उपनगराध्यक्ष संदीप बाहेकर, एड काळे, नरेश कांबळे, सुरेश जगताप, सचिन लिपणे, केशव ढवळे , किरण अंभोरे निवास देशमुख आबासाहेब सरकटे राजेभाऊ खराबे दारासिंग चव्हाण संभाजी खवल गजानन उफाड मेहराज खतीब, रामजी कोरडे, केडी भदर्गे, भगवान आरडे, विवेक काकडे सोपान वायाळ विश्वंभर शेळके , रावसाहेब बाहेकर हनुमान चिखले जगदीश पडोळकर, उद्धव वायाळ, सनी तनपुरे, आसिफ कच्ची, श्रीधर गांजाळे विजय घाडगे राजेभाऊ डेंगळे बंडू नाना खरात पांडुरंग काळे माणिक पवार किरण देशमुख सुनील कांगणे परमेश्वर शिंदे महादेव काळे शरद मोरे राम ेश्वर काकडे अन्साबाई राठोड जयश्री पवार यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी बूथ प्रमुख कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

# संपादकीय पान

## हिमालयाची सावली

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्नी रमाई यांची जयंती. ७ फेब्रुवारी १८९७ रोजी माता रमाई यांचा जन्म एका गरीब कुटूंबात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भिकू धोत्रे ( वलंगकर ) तर आईचे नाव रुक्मिणी असे होते. दाभोळजवळील वनंदगावात नदीकाठी महारपुरा वस्तीमध्ये त्या राहत होत्या. त्यांना तीन बहिणी व एक भाऊ होता. त्यांचे वडील दाभोळ बंदरात माशांनी भरलेल्या टोपल्या पोहचवत असत. रमाई लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. काही दिवसांनी वडिलांचेही निधन झाले. लहान वयातच आई वडिलांचे छत्र हरपल्याने कोवळ्या रमाईच्या मनावर मोठा आघात झाला. आई वडिलांविना पोरक्या झालेल्या या भावंडांना वलंगकर काका व गोविंदपूरकर मामा यांनी मुंबईला आणले. मुंबईतील भायखळा मार्केटच्या चाळीत ते राहू लागले. त्याच सुमारास सुभेदार रामजी आंबेडकर हे आपल्या भीमरावसाठी मुलगी पाहत होते. वलंगकारांकडे लग्नाची मुलगी असल्याचे त्यांना समजले. सुभेदार रामजी आंबेडकर यांनी रमाईला पाहिले. रमाईला पाहता क्षणिच सुभेदाराने तिला आपल्या भीमरावासाठी पसंत केली. रमाई आणि भीमराव यांचा भायखळ्याच्या मार्केटमध्ये विवाह झाला. विवाहाप्रसंगी बाबासाहेबांचे वय चौदा तर रमाईचे वय नऊ वर्ष होत. त्यावेळी बाल विवाहाची प्रथा समाजात रूढ होती. लग्नात पंच पक्वान्ने नव्हती. झगमग रोषणाई नव्हती. अतिशय साध्या पद्धतीने हा विवाह पार पडला. माता रमाईला जीवनात अनेक दुःखे सहन करावी लागली. १९२३ साली बाबासाहेब लंडनला गेले. त्यावेळी रमाईची खुप वाताहत झाली. ती दुष्काळाच्या आगीत होरपळत होती. बाबासाहेबांच्या कार्यकर्त्यांना त्यांचे हाल पहावले नाही त्यांनी काही पैसे जमा केले व ते पैसे रमाईला देऊ केले. त्यांनी कार्यकर्त्यांच्या भावनांचा आदर केला मात्र पैसे स्वीकारण्यास नम्रपणे नकार दिला. रमाई या बाबासाहेबांप्रमाणेच स्वाभिमानी होत्या. माता रमाई या आयुष्यभर दुःखाशी, गरीबीशी जिद्दीने झगडत होत्या मात्र हार मानत नव्हत्या. मृत्यूसत्र, दुःख, त्याग, समजूतदारपणा , कारुण्य, उदंड मानवता आणि मृत्यू यांचे सर्जनशील ज्वलंत प्रेरणास्थान म्हणजे माता रमाई. रमाईने अनेक दुःखे झेलली. त्यांच्या इतके मरण कोणीही पाहिले नसेल. लहान वयातच आई वडिलांचा मृत्यू, १९१३ साली सासरे शुभेदार रामजी आंबेडकर यांचा मृत्यू, बाबासाहेबांचे मोठे बंधू आनंदराव, त्यांचा मुलगा गंगाधर यांचा मृत्यू, १९२१ साली बाबासाहेबांचा मुलगा बाळ गंगाधर, १९२६ मध्ये राजरत्न असे अनेक मृत्यू त्यांनी पाहिले पण त्या डगमगल्या नाहीत. पती बाबासाहेब आंबेडकर परदेशात शिकायला गेल्यावर त्या एकट्या घर चालवत होत्या. घर चालवण्यासाठी तिने शेण गोवऱ्या वेचल्या. बॅरिस्टर पतीची पत्नी शेण गोवऱ्या गोळा करते असे लोक नावे ठेवतील म्हणून त्या पहाटे लवकर उठून शेण गोवऱ्या गोळा करत. आयुष्यभर काबाड कष्ट करून त्यांचे शरीर पोखरून गेले होते. त्यामुळे त्या आजारी पडल्या. जानेवारी १९३५ पासून आजार वाढत गेला. मे १९३५ ला त्यांचा आजार विकोपाला गेला. बाबासाहेबांनी सर्व नामांकित डॉक्टरांना पाचारण केले. मात्र त्यांचे शरीर औषधोपचारांना प्रतिसाद देत नव्हते. बाबासाहेब त्यांना फळांचा ज्यूस, चहा, कॉफी पाजत. मात्र त्यांच्या तब्येतीत सुधारणा होत नव्हती. अखेर २७ मे १९३५ रोजी रमाईची प्राणज्योत मावळली. सर्व परिसर आकांतात बुडाले. बाबासाहेबांना हे दुःख पचवणे अवघड गेले. ते रमाईच्या पार्थिवाशेजारी बसून ढसाढसा रडले. जवळ जवळ तीस वर्षे हिमालयासारख्या महामानवाला धैर्याने व प्रेमाने साथ देणारी हिमालयाची सावली सोडून गेल्याने बाबासाहेब एकाकी पडले. हिमालयाची सावली बनलेल्या त्यागमूर्ती माता रमाई यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

## सऊदी फिल्म नाईट्सने मुंबई, दिल्ली आणि हैदराबादमध्ये उडवला सिनेमॅटिक वादळ

भारतातील सिनेरसिकांसाठी एक अभूतपूर्व सांस्कृतिक पर्वणी ठरलेल्या सऊदी फिल्म नाईट्स या कार्यक्रमाने मुंबई, दिल्ली आणि हैदराबादच्या प्रेक्षकांना मोहिनी घातली.

डोम एंटरटेनमेंटच्या सहकार्याने आयोजित या भव्य कार्यक्रमात माश्निया'स लाईफ, द एज़, स्लेव्ह आणि फीव्हर ड्रीम यांसारख्या उत्कृष्ट सऊदी चित्रपटांचे विशेष स्क्रीनिंग झाले. या चित्रपटांनी सऊदी अरेबियाच्या उत्क्रांत होत असलेल्या चित्रपटसृष्टीचा एक नवा अविष्कार भारतीय प्रेक्षकांसमोर मांडला.

सांस्कृतिक देवाणघेवाणीचा अनोखा सोहळा

स्क्रीनिंगनंतर आयोजित केलेल्या थेट चर्चासत्रांमध्ये सऊदी फिल्ममेकर्सनी सहभाग घेतला आणि दोन भिन्न चित्रपटसृष्टींमधील संवाद, सहकार्य आणि भविष्यातील निर्मितीच्या संधींवर भरभरून चर्चा झाली.

डोम एंटरटेनमेंटचे मोहम्मद मोरानी आणि मझर नादियाडवाला म्हणतात

हे केवळ चित्रपट दाखवण्यापुरते मर्यादित नाही, तर दोन समृद्ध चित्रपटसृष्टींचे एकत्रीकरण आणि भविष्यातील नव्या कलात्मक वाटा मोकळ्या करण्याचा हा एक सुंदर प्रयत्न आहे.




# हॅकथॉन स्पर्धेत तीन शाळांना बक्षिसे देऊन सन्मान

**दत्ता देशमुख**

**जालना-** नवीन शैक्षणिक धोरण २020 नुसार विद्यार्थ्यांनी २१ व्या शतकातील कौशल्ये आत्मसात करावीत सोबतच मुलांमध्ये संगणकीय विचार, सहयोग, सांघिक कार्य (टीम वर्क), तार्किक विचार आणि कोडिंग याचे ज्ञान अवगत होण्यासाठी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, जालना, जिल्हा परिषद (शिक्षण विभाग) जालना, अमेझॉन फ्यचुर इंजिनिअर, लीडरशिप फॉर इक्विटी आणि कोड टू इनहान्स लर्निंग यांच्या संयुक्त विद्यमाने जालना जिल्हयामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अमेझॉन फ्यचुर इंजिनिअर प्रोग्रॅम राबविण्यात येत आहे. यासोबतच जिल्हातील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांच्यासाठी उड क्रलज्ञरींहेप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील ३३ शाळांमधून ९९९१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यातील 0७ शाळांमधून १९४ शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून अनप्लग चॅलेंज पूर्ण केले. यातील उत्कृष्ठ अनप्लग चॅलेंज पूर्ण करणाऱ्या उत्कृष्ठ ३ शाळांची आणि ९ विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी निवड करण्यात आली व त्यांना एक मोठा टिव्ही व दोन संगणक टॅब बक्षीस वितरण हॉटेल अमित येथे आयोजित कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था जालनाचे प्राचार्य डॉ आर डी कांबळे, वरिष्ठ अधिव्याख्याता व समन्वयक डॉ प्रमोद कुमावत, श्री संजय येवते,अधिव्याख्याता श्री योगेश्वर जाधव, डॉ श्रीहरी दराडे, श्री भारत सुर्यवंशी, श्रीमती प्रेरणा मोरे, लिडरशीप फॉर इक्विटीचे श्री युवराज निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.



या स्पर्धेत तीन शाळांना बक्षिसे देण्यात आले आहे. प्रथम शाळा जि.प.प्रा. शा.जळगाव सपकाळ ही आहे या शाळेतून शिक्षक रुपेश सपकाळ ही उपस्थित होते तर इयत्ता आठवीतील सृष्टी सपकाळ प्रथम साळवे वेदिका सपकाळ हे विद्यार्थी उपस्थित होते.

द्वितीय क्रमांक जि प प्रा शा एकलहरा तालुका अंबड या शाळेचा आला असून या शाळेतून श्रीकांत इंगळे हे शिक्षक उपस्थित होते तर इयत्ता चौथीचे प्रांजली बर्डे हर्षाली मस्के देविका खराबे हे विद्यार्थी उपस्थित होते.

तिसरा क्रमांक जि प प्रा शा बरंजळे साबळे या शाळेचा असून या शाळेतून शिक्षक अक्षय शिंगणे हे उपस्थित होते तर कीर्ती मोरे युवराज साबळे राजू लवाळे हे विद्यार्थी उपस्थित होते.

या तीन तीन पैकी प्रथम आलेली शाळा ही राज्यस्तरावर दिनांक १९,२० २१ फेब्रुवारी रोजी उपस्थित राहणार आहे. या यशाबद्दल शिक्षणाधिकारी कैलास दातखीळ, शिक्षण अधिकारी मंगल धुपे यांनी अभिनंदन केले आहे.

# प्रेम आठवडा: कालचं निस्सीम आणि आजचं बदलतं प्रेम

संस्कृती कोणतीही असो त्यातील प्रेम हा शब्द आणि त्यामागील भावना महत्त्वाची ठरते. भारतीय संस्कृतीतही प्रेमाला महत्त्व दिल्याचे दिसून येते. दरवर्षी ७ ते १४ फेब्रुवारी या ८ दिवसात तरुणवर्गामध्ये उत्साहाने साजरा केला जाणारा प्रेम आठवड्याचा उहापोह कशासाठी? हा आठवडा नेमका प्रेमाचा असतो कि स्वैराचाराचा? भारतीय संस्कृतीवर आघात करणारा आणि युवावर्गाचे नैतिक अध:पतन करणारा प्रेम आठवडा आपल्या संस्कृतीप्रधान देशात हवा तरी कशाला?

एखाद्याकडे चोरून पाहणे, हसणे किंवा लाजणे हे प्रत्येकाच्या आयुष्यात कधी ना कधी घडते. असा कुणीही नाही जो या टप्प्यातून गेला नाही. आपल्या काही मित्रांनी या टप्प्यातून जाऊन त्यांचे प्रेम मिळवले असले तरी, असे काही असतील जे अजूनही त्यांच्या प्रियकराला किंवा प्रेयसीला त्यांच्या हृदयातील गोष्टी पोहचविण्याचा प्रयत्न करत असतील. जर तुमचे प्रेम देखील दाखवण्याच्या, लाजण्याच्या आणि हसण्याच्या टप्प्यातून जात असेल, तर तुम्ही थोडे धाडस करून तुमच्या प्रियकर किंवा प्रेयसी समोर तुमचे प्रेम व्यक्त करू शकता. हा तोच महिना आहे ज्यामध्ये हवामानात प्रेमाचा रंग मिसळतो आणि वातावरण आल्हाददायक बनते. या महिन्यात, संपूर्ण जगातील प्रत्येक व्यक्ती प्रेमाच्या रंगात रंगते. संपूर्ण जग फेब्रुवारी महिन्यात १४ फेब्रुवारीला 'व्हॅलेंटाईन डे' प्रेमाचा दिवस म्हणून साजरा करते.

आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रेम हा अविभाज्य घटक आहे. असं म्हटल्या जाते की, प्रेमाने जग जिंकता येतं. तर असेल कदाचित...पण प्रेम म्हणजे नेमकं काय असतं हो? मला सांगाल प्लिज...कारण मला याचा फारसा अनुभव नाही. प्रेमात काय, काय करावं लागतं? याची मला काहीच म्हणजे पुसटशीही कल्पना नाही. विशेष म्हणजे मी प्रेमास पात्र नाही आणि नसेलही कदाचित...हा! समजा अनवधानाने कुणी तरी कळत नकळत माझ्यावर प्रेम केलं असेल आणि करतही असेल तर तो भाग वेगळा...जर तसं असेल तर ते जिथे कुठे असतील तिथे सदैव हसत-खेळत आनंदात राहो. त्याचे सर्व दु:ख मला मिळो आणि माझं सुख त्याला...हिच माझी मनोमन ईश्वर चरणी प्रार्थना..! असं असलं तरीही आजूबाजूची परिस्थिती बघता मन सुन्न करणाऱ्या घटना आणि कटूसत्य अनुभवास येते. खरं तर माणसाला सर्वप्रथम कशाची गरज असेल तर ती प्रेमाची...प्रेम हेच जीवन आहे. जीवनाच्या या प्रवासात कितीही संकटे, अडथळे आली तरी आपण कोणत्या ना कोणत्या मार्गाने ते दूर करू शकतो. पण एखाद्या व्यक्तीच्या तिरस्काराने मात्र आपण पूर्णतः हतबल होतो. प्रेम ही जीवनाला परिपूर्ण करणारी भावना असून ती एक अलौकीक शक्ती आहे. म्हणून प्रत्येकाने आयुष्यभर मनमोकळे प्रेम करावे. एकदा का तुम्ही प्रेमाचे शिखर सर केले तर खरं प्रेम काय असतं ते तुम्हाला कळेल... प्रेम हे एक असं नातं आहे की, प्रत्येक व्यक्ती ते मनापासून निर्माण करण्याचा प्रयत्न करतो. स्वेच्छेने एखाद्यास मानतो आणि दु:खाचे क्षण, अपयशाचे प्रसंग, सुखाच्या आठवणी हक्काने त्यांच्यासोबत वाटून घेतो. परस्परातील मतभेद असं सारं काही बाजूला ठेवून दोन हृदय एकमेकांच्या जवळ येतात. दोन व्यक्तीतील परस्पर हृदयाचा तो गारवा असतो.

प्रेम ही मनुष्याला मिळालेली नैसर्गिक व अनमोल देणगी आहे. खरं प्रेम विना अपेक्षेने आपोआपच होवून जातं. दोन मन केव्हा, कशी व कोणत्या परिस्थितीत जुळतात हे उमजतच नाही. प्रेमामध्ये इतकी प्रचंड शक्ती असते की, माणूस असाध्य गोष्ट ही साध्य करू शकतो. त्यासाठी फक्त त्याला प्रेमाची साथ हवी असते. प्रेम ही परमेश्वराची अशी देण आहे जी अंत:करणातून निर्माण होवून आयुष्यातील क्षणांना सोनेरी करते. कारण माणूस एका यशोशिखरावर प्रगतीनं तेव्हाच झगमगू शकतो, जेव्हा त्याच्या पाठीशी एक प्रेरणात्मक शक्ती उभी असते. ती शक्ती म्हणजे आपल्यावर प्रेम करणारी व्यक्ती असते. केवळ माझ्या शुभेच्छा नेहमी तुमच्यासोबत असतील. खूप मोठे व्हा आणि खूप नाव कमवा म्हटल्यानं कुणी मोठं होत नाही. प्रेमातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्याग व विश्वास... कारण ज्याच्यावर आपण प्रेम करतो, त्याचे सुख कशात आहे हे शोधून त्याच्या सुखासाठी आपल्या सुखाची होळी करावी लागते. प्रेम शेवटपर्यंत यशस्वी होतंच असं नाही. काहींना त्यात रडावंही लागतं. जसं...यासाठी प्रचंड विश्वासाची साथ व विचारांची जुळवणूक असावी लागते.

प्रेम हा शब्द प्रत्येकाच्या जीवनात प्रतिसाद घालतो. ते आई-वडिलांचे, भाऊ-बहिणीचे, मित्र-मैत्रीणीचे किंवा प्रियकर-प्रेयसीचे...आपण जीवनात पहिलं प्रेम हे आपल्या आई (वडील) वर करत असतो, हे तर सर्वश्रूतच आहे. पण याच्याही व्यतीरिक्त आपण एका अशा खास व्यक्तीवर प्रेम करतो, जी व्यक्ती आपल्या हृदयात विशिष्ट स्पंदने निर्माण करतो. ज्याची जागा नंतर कुणीही घेवू शकत नाही. प्रेमाला वयाचं बंधन नसते. ते कोणत्याही वयात, कोणत्याही क्षणी एक वेगळ्याच प्रतिक्रिया घेवून प्रत्येकाच्या जीवनात निर्माण होतात.

प्रेमाची नेमकी व्याख्या अजूनही कुणाला करता आली नाही आणि प्रेम करण्याची पद्धत पण थोडी वेगळी आहे. आजचा युवक असो की युवती फक्त बाह्यांग बघत असते. तो किंवा ती दिसायला किती सुंदर आहे? त्याची राहणीमान आधुनिक पद्धतीनुसार म्हणजे स्टायलीश असल्यास तर मग सांगायचं काही कामच नाही. म्हणजे एकुणच तो आपल्या गरजा पूर्ण करू शकतो का? याचा निकष लावला जातो. म्हणून अशा मुलांवर प्रेम केल्या जाते. याचा कधीच विचार केल्या जात नाही की, तो खरोखर प्रेम करतो की फक्त शारिरीक आकर्षणापुरता...एखाद्या सामान्य कुटूंबातील साधी राहणीमान असणारा मुलगा एखाद्या मुलीवर अंतर्मनातून प्रेम करतो. पण तो आजच्या स्टायलीश पद्धतीनुसार राहू शकत नाही. पण त्याचे तिच्यावरचे प्रेम हे त्याच्या हृदयात कायमचे घर केलेले असते, खरे असते, निस्सीम असते. पण ती मुलगी त्या मनापासून प्रेम करणाऱ्याला कधीच स्वीकार करत नाही. याचे एकमेव कारण म्हणजे तिने लावलेले निकष तो पूर्ण करू शकत नाही. आजच्या युगात या गोष्टींचा विचार केला जातो. पण त्याचे प्रेम किती निर्मळ, पवित्र, अपार आहेत ज्याला मर्यादा नाही हे कधीच बघितल्या जात नाही. या खऱ्या प्रेमाला आजच्या घडीला काहीही किंमत नाही. प्रेमाला स्विकारणे गरजेचे आहे. असे अनेक व्यक्ती आहेत ज्यांना प्रेमाची भाषा कधी कळत नाही आणि असेही काही आहेत जे कळूनसुद्धा प्रेमाला स्वीकारू शकत नाही.

अंतरंग तर चुकूनही कुणी बघत नाही. समजा बाह्यांगावरून चांगली आढळणारी गोष्ट अंतरंगातूनही चांगली असतील याची काय शाश्वती? असो! एकदा अंतरंग बघा! म्हणजे त्याचे मन किती पवित्र आहे? त्याचे विचार किती श्रेष्ठ आहे? एकुणच आपल्याकडे बघण्याचा दृष्टीकोन कसा आहे? इत्यादी गोष्टींचा सारासार विचार करायला पाहिजे. ठिक आहे! आपल्या घरालगतच्या पुढील जागेला आपण अंगण म्हणत असतो. वरून ते आपल्याला अंगण वाटत असलं तरी काय माहित अंतरंगात सोन्याची खाणही असू शकते. याचा कुणीही विचार केला आहे का?

प्रेम हे कसं असावं? कृष्ण-राधासारखं निस्सीम, निर्मळ, हिर-राजासारखं अजरामर नि शहाजहानने बांधलेल्या ताजमहालच्या प्रतिकासारखं...या सर्वांच्या प्रेमकथा अजरामर आहे आणि इतिहास याला साक्ष आहे. आजचं चित्र खुपच विचित्र आहे. प्रेमाला सुरुवात झाली न झाली पहिली डिमांड असते मोबाईलची...त्यानंतरची वस्तुस्थिती तुम्हाला माहितच आहे. काही तर फक्त नि फक्त प्रेमाचा दिखावा करत असते आणि आपल्या गरजानुसार त्याचा वापर करत असते. प्रेमाच्या वाटेत सुखरुपी फुले आणि दु:खरुपी काटे असते. यासाठी प्रत्येक पाऊल विचारपूर्वक व जपून टाकावं लागते. आपले पाऊल काट्यावर पडले तरी चालेल. कारण यामुळे फक्त आपल्याला वेदना होतील. परंतु जर आपले पाऊल त्या फुलावर पडले तर त्या फुलाचे सौंदर्य, जीवनच नष्ट होईल. म्हणून आपल्या मनाच्या कोपऱ्यात एखाद्याला जागा द्यायची असल्सास ती आयुष्यभरासाठी द्यावी. अन्यथा त्या गोष्टीचा विचारच मनात आणू नये. पण वास्तविक जीवनाचं स्वरूप थोडं वेगळं आहे. कुणी तरी आपल्या जीवनात डोकावतं, आपल्या भावनांशी खेळतं. हा खेळ सुरू असताना आपण उज्ज्वल संसाराचे स्वप्न रंगवीत असतो. पण ते आपल्याला स्वप्नांच्या सोनेरी क्षितीजावर स्वप्न दाखवून, दुराव्याच्या खाडीत ढकलून जीवनाच्या अर्ध्या वाटेवरच सोडून जातात. प्रत्येकालाच प्रेम करणारं कुणीतरी आपलं हवं असतं. जीवन जगायला नव्हे तर फुलवायला. तारुण्यात तर असं विश्वासाचं, जिव्हाळ्याचं, आपुलकीचं नातं, नकळत जुळून येणारं नातं प्रत्येकाला आपल्या आयुष्यात हवहवसं वाटतं.

प्रेमातील सर्वात महत्त्वाची अडसर म्हणजे जात...बऱ्याच प्रेमींचं ब्रेकअप हे जातीमुळेच होत असते. मला एक सांगता का हो! आदिमानवाच्या काळात किती जाती होत्या? या जातीची उत्पत्ती कुठून झाली आहे? याचा आजचा समाज का बरं विचार करत नाही. का बरं आपला समाज प्रेम भावना समजून घेण्याइतपत अजून सक्षम झालेला नाही. ही एक प्रेमाविषयीची शोकांतिका आहे. प्रेमाला समजून न घेतल्यास अशी कित्येकांचे प्रेम मनातच दडपल्या जातात. त्यांच्यात जातरुपी अंतरपाट वियोगाची भिंत बांधल्या जाते. तसं बघता जाती दोनच स्त्री आणि पुरुष...बरं ठिक आहे! मी पण तुमच्या विचारांशी सहमत आहे. मला दाखवता का असा व्यक्ती ज्यांचं रक्त सप्तरंगापैकी एक आहे. मग का बरं इतकी चुकीची विचारधारणा...

मला एक कळत नाही की, जेव्हा एखाद्याचं लग्न जुळतं, तेव्हा ते तोडावं नाही पण जोडावं असं म्हटल्या जाते. मग प्रेम करणाऱ्यांना का बरं तोडल्या जाते. तेव्हा त्यांची संस्कृती, संस्कार कुठे गहाण पडलेली असते. खरं तर लग्नातील जोडपं प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत अनभिज्ञ असते. पण प्रेमात तर एकमेकांच्या सर्वच गोष्टी जाणून असते. ते देहाने जरी अलग असले तरी पण मनाने, हृदयाने मात्र एकच असते.

आमच्या काही लेखक लेखिकांचे
थाटामाटात प्रेमविवाह उरकले आहे
यशस्वी संसाराच्या गाड्याची चाके
सामाजिक गालबोटाने डगमगले नाही

**शब्दस्पर्शी- सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी- ७०५७१८५४७९**

## पान १ वरुन

### शेतकऱ्यांनी रेशीम ...

कोषांना चांगला दर मिळण्यास मदत होणार आहे. करीता जालना जिल्ह्यातील प्रमाणात शेतकऱ्यांनी मोठ्या नवीन तुती लागवडीसाठी नोंदणी करावी, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

एक एकर तुती लागवडी करीता मनरेगा योजने अंतर्गत अनुदान देण्यात येते तसेच एक एकर तुती लागवडी पासुन वर्षभरात २.५ ते ३ लाख पर्यंत रेशीम कोषांचे उत्पादन होते. महारेशीम अभियान-२५ अंतर्गत नोंदणी करावयाची अंतिम मुदत ९ फेब्रुवारी असुन या करीता शेतकऱ्यांनी जिल्हा रेशीम कार्यालयाशी संपर्क साधुन मोठ्या प्रमाणात नोंदणी करावी, असे आवाहन रेशीम विकास अधिकारी अजय मोहिते यांनी केले.

कार्यक्रमामध्ये वडीकाळे येथील १0 वर्षापासुनचे रेशीम उत्पादक शेतकरी गणेश काळे व दादाराव काळे यांनी आपले त्यांना रेशीम शेतीमधुन कसा फायदा झाला याविषयी अनुभव कथन केले. रेशीम शेतीपासुन चांगले उत्पादन घेणारे शेतकरी गणेश काळे, दादाराव काळे, शंकर गाडेकर यांचा तसेच महारेशीम अभियानात चांगले काम करणारे मनरेगाचे कर्मचारी सुनिल काळे, नितेश कनके, राहुल शेळके यांचा जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांच्या आवाहनास प्रतिसाद देत वडीकाळे येथील ६0 व कुकडगाव येथील १0 अशा एकुण ७0 शेतकऱ्यांनी तुती लागवडी करीता नोंदणी केली.

### बहारदार त्रैभाषिक ...

असे म्हणत धाराशिव येथील राजेंद्र अत्रे यांनी वर्तमान वैचारिक चळवळीचा, चळवळीतील निष्ठावंत म्हणून घेणाऱ्या नेत्यांचा आपल्या गझलेतून चांगलाच समाचार घेतला. उत्तरोत्तर रंगत जाणाऱ्या मुशायऱ्याचे डॉ. शेख इकबाल मिन्ने यांनी बहारदार सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. यशवंत सोनुने यांनी केले, तर भाषा साहित्य संस्कृती संशोधन परिषदेची भूमिका जिल्हाध्यक्ष डॉ. सत्यशीला तौर यांनी मांडली. कार्यक्रमासाठी डॉ. शिवाजी हुसे, प्रा. बसवराज कोरे, डॉ. रावसाहेब ढवळे, डॉ. के.जी. सोनकांबळे, भगवानराव डोंगरे, कॉ. अण्णा सावंत, डॉ. सुहास सदाव्रते, डॉ.भगवानसिंह डोभाळ,डॉ. उमेश मुंढे,डॉ. राजेंद्र सोनवणे,डॉ. एफ. एम. मोहिते, डॉ. बी.जी. श्रीरामे, प्रा. उद्धव बिन्निवाले, डॉ. बाबासाहेब वाघ आदीसह शहरातील प्रसिद्ध नागरिक तसेच भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषदेचे सर्व पदाधिकारी, महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. एकनाथ शिंदे यांनी केले तर आभार प्रा. बाबासाहेब खंडाळे यांनी मानले. तांत्रिक बाजू डॉ. वसंत उगले व श्रीनिवास सैंदर यांनी अत्यंत सक्षमपणे सांभाळली.

### कबड्डी असोसिएशनच्या ...

इच्छिणाऱ्या संघासाठी २00 रुपये नोंदणी फीस आकारण्यात आली असून या स्पर्धेत जास्तीत जास्त संघांनी सहभागी होऊन कबड्डी असोसिएशनला सहकार्य करावे, असे आवाहन असोसिएशनचे डॉ. अशोक हजारे, नंदकिशोर खर्डेकर, डॉ. देवेश पाथ्रीकर, माधवी काळे, भास्कर पालवे, रामदास निहाळ, अशोक पांगारकर, अक्षय गोरंट्याल, प्रशांत तेलगड यांनी केले आहे.

# सहामास कार्यक्रमात वडिलांना लेकाची वैचारिक आदरांजली

**लोणार । प्रतिनिधी -** तालुक्यातील चिखला काकड येथील सामाजिक कार्यकर्ते विनायक काकड यांच्या वडिलांचे निधन १७ ऑगस्ट २०२४ रोजी झाले. त्यांच्या वडिलांची वारकरी संप्रदायावर प्रचंड निष्ठा होती आणि ते तत्वनिष्ठ होते. जिवंतपणी कधीच कुणाचे वाईट केले नाही मग त्यांच्या मरणानंतर पर्यावरणाला देखील कुठलाचं त्रास नको.

माणूस गेल्यानंतर आपण रक्षा आणि अस्थि व इतर वस्तू नदीमध्ये विसर्जित करतो पण त्याचे विघटन होण्यासाठी बराच काळ लागतो व त्याचा जलचरास त्रास देखील होतो. तोच त्रास टाळण्यासाठी व पर्यावरणाला हानी करणाऱ्या रुढींना थांबवण्यासाठी मुलगा विनायक यांनी एक क्रांतिकारी निर्णय घेतला.

वडिलांची रक्षा नदीमध्ये विसर्जित न करता आपल्या शेतामध्ये नेऊन त्यावर वृक्षारोपण केले.

जेणेकरून वडिलांची आठवण कायम राहील व हे वृक्ष पर्यावरणास पूरक ठरेल.

त्यानंतर वडीलांच्या सहा मास विधी व नैवद्य कार्यक्रमात देखील विनायकने अनोख्या आदर्श पद्धतीने राबविला. स्व.जगन्नाथ काकड हे उत्तम वाचक होते व ते पर्यावरणवादी, पर्यावरणप्रेमी देखील होते त्यांना वृक्षारोपणाची प्रचंड आवड होती.

आज दिवसेंदिवस वाचन चळवळ ही लोप पावत चालली आहे आणि निसर्गाचा देखील ऱ्हास होत चालला आहे. वाचन चळवळ वृंध्दिगत व्हावी व पर्यावरण रक्षणाचा छोटासा संदेश देण्याचा विनायकने प्रयत्न केला आहे.

वडीलांच्या सहा मास नैवद्य कार्यक्रमात विनायकने कुठलाही अपव्यय खर्च न करता कार्यक्रमासाठी उपस्थित प्रत्येक पाहुणेमंडळी, मित्रपरिवार, आप्तेष्टांना विनायकने पुस्तकं व दुर्मिळ रोपांच्या बिया देऊन वाचनाचे व वृक्षरोपणाचे आवाहन करून वडिलांना अनोखी आदरांजली दिली आहे. आपली वाचनाची व पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा हीच माझ्या वडिलांना खरी आदरांजली असेल असेल विनायक काकड यांनी उपस्थितांना संबोधित केले आहे.

विनायक काकड हे उत्तम वक्ता व सामाजिक कार्यकर्ते देखील आहेत. अनेक सामाजिक चळवळीत ते सक्रिय सहभागी असतात. ते सध्या निर्मला निकेतन समाजकार्य महाविद्यालय मुंबई येथे पदवीचे शिक्षण घेत आहेत. विनायकच्या या अनोख्या विचाराने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. वाचन व पर्यावरण चळवळ ही प्रत्येक व्यक्तीच्या मरणोत्तर राबवावी यासाठी विनायकने समाजामध्ये प्रबोधन करण्याचा निर्धार वडिलांच्या सहामास कार्यक्रमात केला आहे.

# तळाशेत जिल्हा परिषद मतदार संघात भाजपाची ताकद वाढली

## प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाणांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** दक्षिण रायगड युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष निलेश थोरे यांच्या प्रयत्नाने तळाशेत जिल्हा परिषद मतदारसंघात उबाठाचे उप तालुकाप्रमुख श्री सुधीर म्हामुणकर,साई पंचायत समिती गण प्रमुख श्री. संतोष कळंबे यांच्या समवेत सौ.रसिका राजेंद्र कळंबे सरपंच ग्रुप ग्राम पंचायत पेण/तळे, श्री.नामदेव ताम्हणकर,उपसरपंच ग्रुप ग्राम पंचायत पेण /तळे,श्री.विजय पेणकर माजी उपसरपंच व सदस्य ग्रामपंचायत पेण/तळे,संतोष कळंबे,ग्राम पंचायत सदस्य पेण/तळे,श्री. नयन पोटले सामाजिक कार्यकर्ते,श्री.दत्तारामजी वडेकर,माजी अध्यक्ष पेण गाव,श्री.गणेश वडेकर,युवानेते श्री.अनिल लाड,श्री. दत्ताराम सुतार,श्री.नारायण मांगले,श्री.सुरेश मांगले,श्री. लक्ष्मण दिवेकर,श्री.दिनेश वडेकर,श्री.सुनील भोसले,श्री. सुभाष कालप,श्री.रमेश जाधव,श्री.सचिन जाधव, श्री.मंगेश वडेकर,श्री.महादेव बंगाल,श्री.किशोर पोटले,श्री. केशव मोंडे,श्री.सचिन लाड,श्री.मधुकर म्हामुणकर,श्री.शैलेश म्हामुकार,श्री.महादेव पेडणेकर, श्री.बापु पेडणेकर,श्री. राजेंद्र सकपाळ श्री.भोलानाथ खिडबिडे,श्री.हेमंत ईप्ते,श्री.सचिन काशीम ,श्री.मधुकर वडेकर,श्री.रामचंद्र पेणकर श्री.अनिल वाघरे,श्री. प्रकाश मोहे,श्री.संतोष कालप, श्री.अनिल पारधी,श्री.रवींद्र भावे यांच्यासमवेत शेकडो कार्यकर्त्यांनी प्रदेश कार्यकारी अध्यक्ष आ. रवींद्रजी चव्हाण साहेब,प्रदेश उपाध्यक्ष अतुलजी काळसेकर,आमदार प्रशांतदादा ठाकूर,लोकसभा प्रमुख सतीशजी धारप यांच्या शुभहस्ते त्याचप्रमाणे सहकार आघाडी मा.गिरीशजी तुळपुळे,श्रीवर्धन विधानसभा प्रमुख प्रशांतजी शिंदे,सरचिटणीस ऍड.महेशजी मोहिते,सरचिटणीस मा. बिपीनदादा म्हामुणकर,मा.वैकुंठशेठ पाटील,माणगांव तालुका अध्यक्ष गोविंदजी कासार व सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला.



या पक्षप्रवेशामुळे साई पंचायत समिती गणामध्ये भाजपा निर्णायक भूमिकेमध्ये आली असून तळाशेत जिल्हा परिषद मतदार संघावर दिवसेंदिवस भाजपाची पकड मजबूत होत असल्याचे अधोरेखित झाले आहे.या मतदार संघामध्ये भाजपा युवानेते निलेश थोरे यांना आ.मा.रवींद्र चव्हाण यांनी विशेष जबाबदारी दिली असल्याचे समजत असून त्यांच्याच वरदहस्ताने भाजपा ग्रामीण भागात रुजत असल्याचे दिसत आहे.मा. रवींद्र चव्हाण साहेबांनी व आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत करून पूर्ण ताकदिनीशी भागाचा विकास करणार असल्याचे वचन दिले आहे.

# नेहरु युवा केंद्रातील राष्ट्रीय युवा स्वयंसेवकासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** भारत सरकारच्या राष्ट्रीय युवा कोर योजनेअंतर्गत राष्ट्रीय युवा स्वयंसेवक जालना जिल्ह्यातील प्रत्येक तालुकास्तरावर नेमण्यात येणार आहेत. विहीत अर्जाच्या नमुना नेहरू युवा केंद्र संगठनच्या www.nyks.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी जिल्ह्यातील उमेदवारांनी ऑनलाइन अर्ज सादर करून त्याची प्रत आवश्यक कागदपत्रासह नेहरू युवा केंद्र जालना येथे शनिवार दि. ८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर करावी, असे आवाहन नेहरु युवा केंद्राचे जिल्हा युवा अधिकारी प्रणित सांगवीकर यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे. भारत सरकार तरुणांना 'डिजीटल कृषी मिशनच्या' अंमलबजावणीमध्ये सहभागी करून घेऊ इच्छित आहे. तसेच युवांना स्वयंसेवी गटांमध्ये संघटित करून त्यांची ऊर्जा आणि क्षमता राष्ट्र उभारणीच्या कार्यासाठी वापरण्यासाठी उत्सुक आहे. स्वयंसेवकांना आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, लिंगभेद आणि इतर सामाजिक समस्यांवर आधारित मोहिमा, जागरूकता कार्यक्रमांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्यास सांगितले जाऊ शकते आणि आपत्कालीन परिस्थितीत किंवा विविध कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी आवश्यकतेनुसार प्रशासनाला मदत करण्यास सांगितले जाऊ शकते.

उमेदवार किमान पदवी शिक्षण घेणारा किंवा पदवीधर किंवा पदव्युत्तर, वय १८ ते २९ वर्षादरम्यान असावे. उमेदवार ज्या तालुक्यासाठी अर्ज करीत आहे त्या तालुक्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे. ज्यांनी पूर्वी या पदावर काम केलेले आहे ते अर्ज करण्यास पात्र नसतील. प्रत्येक तालुक्यात ३ स्वयंसेवकांची जास्तीत जास्त तीन महिने किंवा किमान १५ दिवसांसाठी कामाच्या आवश्यकतेनुसार निवड करण्यात येईल तसेच त्यांना प्रति महिना ५ हजार रुपये मानधन देण्यात येईल. ही सेवा पगारी नोकरी तसेच कायम स्वरूपी नाही. स्वयंसेवकाला सरकारकडून कोणत्याही प्रकारच्या रोजगाराचा दावा करण्याचा कायदेशीर अधिकार नसेल. अधिक माहितीसाठी पत्ता- ३-१६, नरीमन नगर, रेल्वे स्टेशन जवळ, जालना - ४३१२१३, ई-मेल : qnykjalnagmail. com, संपर्क क्रमांक: ७८७५४६४७०३ येथे संपर्क साधावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# विद्यार्थ्यांनी परीक्षा काळात आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे - बाबासाहेब तरवटे

**परतूर । प्रतिनिधी -** परीक्षा काळात अभ्यासा सह स्वतः च्या आरोग्याकडे पण लक्ष देणे तेवढेच गरजेचे असल्याचे मत परतूर येथील लाल बहादूर शास्त्री कन्या विद्यालयात इयत्ता दहावी च्या मुलींना परीक्षा विषयावर मार्गदर्शन करताना केंद्रप्रमुख बाबासाहेब तरवटे यांनी मांडले यावेळी रामप्रसाद नवल यांची प्रमुख उपस्थिती होती.




दि २१ पासून इयत्ता दहावी च्या परीक्षेला सुरुवात होणार आहे.त्या अनुषंगाने केंद्रप्रमुख, तरवटे यांनी दहावीच्या मुलींना मार्गदर्शन केले. यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की,योग्य नियोजन करून परीक्षा मधील प्रश्न पूर्ण वाचून नंतर उत्तर लिहावे तसेच याकाळात आरोग्याची काळजी घ्यावी सहा तास झोप घ्यावी फळे व आहार चांगला घ्यावा असे सांगितले.

यावेळी.श्याम कबाडी,सुरेश मसलकर,सचिन कांगने आदी उपस्थित होते.

बुध्दीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क रायगड आणि राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ यांच्या संयुक्त उपक्रम

# माणगाव येथे त्याग मूर्ती माता रमाई जयंती सोहळ्याचे आयोजन

**बोरघर । माणगाव । प्रतिनिधी -** महापुरुष व महा माता जीवन संघर्ष बहुजन जोडो अभियान अंतर्गत बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क रायगड जिल्हा आणि राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघाच्या वतीने त्याग मूर्ती माता रमाई यांच्या १२७ व्या जयंती महोत्सव कार्यक्रमाचे आयोजन त्याग मूर्ती माता रमाई यांच्या जयंती दिनी अर्थात शनिवार दिनांक ०८ फेब्रुवारी २०२५ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सांस्कृतिक भवन माणगाव येथे दुपारी २:०० ते सायंकाळी ६:०० या वेळेत करण्यात आले असून सदर कार्यक्रमाचे उदघाटन मा. सौ. गायत्री घोणे मॅडम महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा भारत मुक्ती मोर्चा महिला विंग्स यांच्या हस्ते होणार असून सदर कार्यक्रमाची अध्यक्षता मा. सौ. सरोज पैठणे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष या भूषविणार आहेत. तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सौ. सुधा साळवी ( मोरे ) मॅडम करणार आहेत.



दीन दुबळ्यांची सावली व भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार, महामानव, बोधिसत्व, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची सावली त्याग मूर्ती माता रमाई आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंती महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर १) त्याग मूर्ती माता रमाई यांचा जीवन संघर्ष आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या आंदोलनातील सहभाग २) ज्या उद्दिष्टासाठी माता रमाई ने त्याग व समर्पन केले, काय ते उद्दीष्ट साध्य झाले एक समिक्षा ३) संघटीत शक्ती निर्माण केल्या शिवाय व्यवस्था परिवर्तन करणे शक्य नाही एक गंभीर चिंतन या विषयावर कार्यक्रमातील नियोजित वक्त्या मा. सौ. उमा तारु मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ जिल्हा अध्यक्षा, मा. सौ. सुजाता कासे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ राज्य कार्यकारिणी सदस्य, मा. सौ. पुनम धनंजय पवार मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ राज्य संघटक, मा. सौ. उर्मिला मोरे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ उपाध्यक्ष कोकण या भाष्य करणार आहेत.

बुद्धीस्ट इंटरनॅशनल नेटवर्क रायगड जिल्हा आणि राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ आयोजित त्याग मूर्ती माता रमाई आंबेडकर जयंती महोत्सवास मा. सौ.माधुरी रवींद्र मोरे मॅडम मा. नगर सेविका, मा. सौ. सुप्रिया साळवी मॅडम विश्वस्त पंचशील महिला मंडळ गोरेगाव, मा. सौ. अंकिता सकपाळ मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ अध्यक्ष महाड, मा. सौ. सुवर्णा प्रकाश ओव्हाळ मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ उपाध्यक्ष, मा. सौ. साधना कासे मॅडम सल्लागार शाखा क्रमांक ४ इंदापूर महिला, मा. सौ. शितल राकेश मोरे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक माणगाव, मा. सौ. दिव्या दिपक मोरे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ अध्यक्ष माणगाव, मा. सौ. ऋचिता जाधव मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक महाड, मा. सौ. मनस्वी महेश जाधव मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ अध्यक्ष म्हसळा, मा सौ सीमा राजकुमार मोरे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ उपाध्यक्ष माणगाव, मा सौ जरिन परदेशी मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ माणगाव, मा सौ रुपाली मिलिंद साळवी मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक माणगाव, मा सौ शुभांगी सुनील मोरे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक रायगड जिल्हा कार्याध्यक्ष, मा सौ विद्या विश्वास गायकवाड मॅडम मा. मुख्याध्यापिका, मा सौ विधी विजय जाधव मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ सचिव म्हसळा, मा डॉ त्रिशला ध. वाघमारे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक, मा सौ फातिमा समीर कद्रेकर मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक माणगाव, मा सौ ज्योती गौतम मनवर मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ सचिव माणगाव, मा सौ ज्योत्स्ना हाटे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ उपाध्यक्ष रायगड, मा सौ निर्मला वडमारे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ उपाध्यक्ष रायगड, मा सौ रंजना अमरनाथ गाडे मॅडम राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ सदस्य रायगड, मा डॉ माधुरी भगत मॅडम प्राध्यापक डॉ बाबासाहेब आंबेडकर तंत्र शास्त्र विद्यापीठ लोणेरे, मा श्रीमती यशोदा बा. तांबे राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक माणगाव, मा सौ नसिमा मोहमद जा. शेख राष्ट्रीय मुलनिवासी महिला संघ संघटक माणगाव इत्यादी महिला मान्यवरांची उपस्थिती लाभणार असून सदर जयंती सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

# माता रमाई फेस्टिवल मंठ्यात विविध स्पर्धा संपन्न

**मंठा । प्रतिनिधी -** त्यागमूर्ती माता रमाई भीमराव आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त आणि विविध स्पर्धांचे फेस्टिवल जयंती उत्सव समिती मंठा वतीने आयोजित करण्यात आले. जात निबंध स्पर्धा भाषण शुद्धलेखन रांगोळी स्पर्धा वकृत्व स्पर्धा बाली का, गोपालांसाठी या मेजवानीचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये मुख्य मान्यवर स्वाती सिद्धार्थ अवसरमोल, अनिता मनोहर वाघमारे, मंगल ढाकरगी उद्घाटक होत्या तर द्वारका विकास प्रधान परमिता वाघमारे शितल खंदारे सखी मोरे उज्वला तायडे मीरा खंडपटे संध्या प्रधान प्रमुख उपस्थितीमध्ये स्पर्धा घेण्यात आल्या. मंठा शहरामध्ये प्रथमच माता रमाई फेस्टिवल आणि जयंती उत्सव साजरा करण्यात येत असून दिनांक ७ फेब्रुवारी जयंती उत्सव साजरा करण्यात येणार आहे.



मंठा शहर, तालुक्यातील सर्व उपासक उपासिका यांनी जयंती उत्सवामध्ये सहभागी होण्याचे आवाहन जयंती उत्सव समिती वतीने करण्यात आली आहे.

# वस्तीगृहात १७ वर्षिय विद्यार्थीनीची आत्महत्या



**बदनापुर । प्रतिनिधी -** तालुक्यातील कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय येथील विद्यार्थीनी ज्योती संजय सुरासे वय वर्ष १७ वर्ष रा. किन्होला ता. बदनापूर कला विज्ञान वाणिज्य विद्यालय येथे १२ वी वर्गात शिकत असणारी विद्यार्थिनीने दिनाक ५ फेब्रुवारी बुधवार रोजी रात्री ९.३० वाजता गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. आत्महत्याच कारण अद्याप स्पष्ट नसून सदरील प्रकरण हे आत्महत्या आहे की घातपात हे पोलीस तपासात निष्पन्न होईल.

घटनेची माहिती मिळताच बदानाअपूर पोलीस ठाण्याचे पो.निरि. भागवत यांनी फौज फाट्याषाह घटनास्थळी धाव घेऊन घटनेचा पंचनामा केला. पोलीसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी बदनापूर येथील ग्रामिण रुग्णालयात पाठविला. त्या नंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधिन करण्यात आला.

विद्यार्थीनीच्या आत्महत्ये बाबत बदनापुर तालुक्यातील ही दुसरी घटना असून या घटनेमुळे तालूक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान परीक्षेमध्ये कमी मार्क पडले किंवा रिझल्ट बरोबर आला नाही तर विद्यार्थ्यांनी असे टोकाचे पाऊल न उचलता जिद्दीने आणि मेहनतीने पुन्हा प्रयत्न करावे असे आवाहन बदनापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना केले.

# चोरी व घरफोडी करणारे सहा आरोपी जालना जिल्ह्यातुन हद्दपार

## स्थानिक गुन्हे शाखा व सदर बाजार पोलिसांची संयुक्त कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यामध्ये चोरी व घरफोडी करणाऱ्या सहा आरोपींना जिल्ह्यातून हद्दपार करण्याची कारवाई करण्यात आली.

१) राजु शामराव सुरासे वय ४९ वर्ष रा.साईनगर देऊळगाव राजा जि. बुलडाणा, २) जावेद अन्वर पठाण वय ४० वर्ष रा. इंदिरानगर जालना ३) अभिजीत दुर्योधन राठोड रा.जळगाव सोमनाथ ता.जि. जालना ४) शेख शोएब ऊर्फ शेरु शेख गफ्फार रा.लालबाग जालना ५) ओंकार विनोद स्वामी रा.लोधी मोहल्ला जालना ६) सतनामसिंग शामसिंग टाक रा. गुरुगांविंदसिंग नगर जालना असे हद्दपार करण्यात आलेल्या ईसमांची नावे असून यांना ०१ वर्ष कालावधी साठी जालना जिल्हयातुन हद्यपार केले आहे.

मालाविरुध्दचे व शरिराविरुध्दचे गुन्हे करुन तसेच अग्नीशस्त्रे बाळगणारे आरोपीविरुध्द अशाच प्रकारची सक्त कारवाई करण्यात येणार असल्याचे पोलीस अधीक्षक, जालना यांनी सांगितले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी अंनत कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी दादाहरी चौरे, पोलीस निरीक्षक पंकज जाधव, स्थानिक गुन्हे शाखा जालना, पोलीस निरीक्षक, संदीप भारती पो.स्टे. सदर बाजार, सपोनि. मिथुन घुगे, पो.स्टे. मौजपुरी पोलीस अंमलदार रुस्तुम जैबाळ, सचीन राऊत स्थागुशा जालना, भरत ढाकणे, गणेश तेजनकर, प्रदीप करतारे पो.स्टे. सदर बाजार यांनी केली आहे.

# जिल्हयातुन हद्दपार टोळी प्रमुखास स्थानिक गुन्हे शाखेकडून जेलबंद

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील पो. स्टे तालुका जालना हददीतील हददपार इसम किरण देवानंद भोसले वय २६ वर्षे रा.इंदीरा नगर जालना हा टोळी प्रमुख पोलीसांना मिळुन येत नव्हता. सदरील टोळी प्रमुख किरण देवानंद भोसले हा मा. न्यायालयाच्या समोरील रोडवर फिरत असले बाबत माहिती मिळाल्यावरुन सदर ठिकाणी जावुन शोध घेतला असता वरील इसम मिळुन आला त्यास तातडीने ताब्यात घेण्यात आले. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पंकज जाधव, पोलीस निरीक्षक स्थागुशा जालना, योगेश उबाळे, राजेंद्र वाघ, पोलीस उप निरीक्षक, व पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, भाऊराव गायके, प्रभाकर वाघ, रमेश राठोड, सुधिर वाघमारे, संजय सोनवणे, रमेश काळे, सर्व ने. स्थागुशा जालना यांनी केली आहे.

पुण्यात मोफत होमिओपॅथिक क्लिनिक लोकसेवेत रुजू

## गरजूंना वैद्यकीय मदत आणि महिलांना व्यवसायिक साक्षर करणार- डॉ. कदम



**पुणे । प्रतिनिधी -** विश्रांतवाडीयेथील मोफत क्लिनिक आणि वैद्यकीय मदत कक्षामुळे गोरगरीब जनतेला नक्कीच मोठा दिलासा मिळेल. डॉ. कदम दाम्पत्य उच्च शिक्षित असून त्यांची सामाजिक भावना प्रशंसनीय आहे. त्यांच्या या सेवेचा लाभ नागरिकांनी नक्की घ्यावा असे आवाहन कृषीरत्न/कृषीमहर्षी डॉ. बूधाजीराव मुळीक यांनी केले.

डॉ. योगेश कदम यांच्या वाढदिवसानिमित्त भूमाता चॅरिटेबल क्लिनिकचे लोकार्पण आणि वैद्यकीय मदत कक्षाचे उद्घाटन तसेच महीला भगिनींसाठी मोफत व्यावसायिक मार्गदर्शन, रविवार दि. २ फेब्रुवारी रोजी कृषीरत्न, कृषीमहर्षी डॉ. बूधाजीराव मुळीक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी लिज्जत पापडचे सुरेश कोते, व्यावसायिक मार्गदर्शक एस. एस. सावंत, डॉ. भाग्यश्री कदम उपस्थित होते. तसेच आमदार बापूसाहेब पठारे, माजी आमदार जगदीश मुळीक, सुनील टिंगरे, मनपा आयुक्त राजेंद्र भोसले, भूमाता युवा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत भैय्या जगताप, उद्योजक किसन भोसले, राष्ट्रवादी वैद्यकीय पक्षाचे निनाद टेमगिरे यांनी देखील डॉ. योगेश कदम व सौ. भाग्यश्री कदम यांना शुभेच्छा दिल्या.

डॉक्टर कदम यांनी प्रयागराज कॉर्नर, विद्यानगर येथे चालू केलेल्या वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून परिसरातील गरीब नागरिकांना नक्कीच मदत होईल. सोबतच रुग्णालयाचे मोठमोठे बिल कमी करण्यात देखील सहकार्य केले जाणार असल्याची माहिती डॉक्टर योगेश कदम यांनी याप्रसंगी दिली.

# सप्टेंबरमध्ये झालेल्या अतिवृष्टीचे अनुदान मंजूर

### माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांची माहिती

**परतूर । प्रतिनिधी -** १ सप्टेंबर २०२४ रोजी परतूर विधानसभा मतदारसंघातील अनेक गावांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकाचे प्रचंड मोठे नुकसान झाले असून अनेक गावांमध्ये अतिवृष्टी नसली तरी सततच्या पावसामुळे खूप मोठे नुकसान झाले आहे त्या नुकसानीची भरपाई तात्काळ देण्यात यावी अशी मागणी वारंवार माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी लावून धरली होती, त्या मागणीला आता यश आले असून सदरील अतिवृष्टीचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे त्या अनुदानाची रक्कम तहसीलदार मंठा व परतुर यांच्याकडे जमा झाली असल्याची माहिती माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी दिली.

परतुर तालुक्यामध्ये ५७ गावात एक सप्टेंबर २०२४ रोजी प्रचंड अतिवृष्टी झाल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते त्यामध्ये २५ हजार ४५४ बाधित शेतकऱ्यांचा समावेश असून या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई च्या स्वरूपात ३२ कोटी ६१ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तर मंठा तालुक्यातील ८५ गावांमध्ये अतिवृष्टी झाली होती त्यामध्ये ४५५७१ शेतकरी बाधित झाले असून त्यांच्या नुकसानीची भरपाई म्हणून शासनाच्या वतीने ५५ कोटी ८८ लाख रुपये मंजूर करण्यात आले आहेत असे मंठा व परतुर दोन्ही तालुके मिळून ७१०२५ शेतकऱ्यांना ८८ कोटी ४९ लाख रुपये रक्कम प्राप्त झाली असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले.

परतुर व मंठा तालुक्यातील मंठा, परतूर, श्रीष्टी व वाटुर अशी चार मंडळे ६५ मिली पेक्षा कमी पाऊस पडल्यामुळे वगळण्यात आली होती. परंतु या सर्व मंडळांमध्ये सततच्या पावसामुळे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. ही बाब माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली होती. या स्वतःच्या पावसामुळे देखील अनेक शेतकऱ्यांची अतोनात नुकसान झाले असल्याचे आमदार बबनराव लोणीकर यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व कृषी मंत्री धनंजय मुंडे यांच्या निदर्शनास प्रत्यक्ष भेट घेऊन व पत्रव्यवहार करून आणून दिले होते. सततच्या पावसामुळे ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त शेतकऱ्यांना देखील सरसकट मदत करण्यात यावी अशी मागणी आमदार बबनराव लोणीकर यांनी यापूर्वी देखील केली होती आणि आता देखील आपण या मागणीचा सातत्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पाठपुरावा करणार असल्याचे आमदार लोणीकरांनी स्पष्ट केले.



अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांना अनुदानाची रक्कम मंजूर झाल्यानंतर बाधित शेतकऱ्यांची यादी तलाठी ग्राम सेवक व कृषी सहाय्यकाच्या माध्यमातून अपलोड करणे अपेक्षित आहे. परंतु अद्याप पर्यंत अनेक गावांमधून या याद्या अपलोड करण्यात आलेला नाहीत याची गंभीर दखल घेत आमदार बबनराव लोणीकर यांनी आज परतुर व मंठा या दोन्ही तालुक्याचे तहसीलदार, गटविकास अधिकारी व तालुका कृषी अधिकारी यांना कठोर शब्दात सूचना करत शेतकऱ्यांच्या अनुदानाची रक्कम तात्काळ त्यांच्या खातात जमा करण्यासंदर्भात कुठल्याही प्रकारची निष्काळजीपणा करू नये अन्यथा लोकप्रतिनिधी म्हणून आम्हाला कठोर भूमिका घ्यावी लागेल अशा शब्दात सुनावले महसूल पंचायत व कृषी प्रशासनाच्या वतीने याची गंभीर दखल घेतली आणि तात्काळ सर्व बाधित शेतकऱ्यांच्या याद्या अपलोड केल्या तर आठवडाभरात शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा होऊ शकते असेही आमदार बबनराव लोणीकर यांनी स्पष्ट केले आहे.

# अवैध रेती तस्करीला सहकार्य करणाऱ्या मंडळाधिकारी व तलाठ्याची तात्काळ बदलली करा

### सरपंचांनी केली उपविभागीय अधिकारी व तहसीलदारांकडे तक्रार

**जालना । प्रतिनिधी -** तालुक्यातील पूर्णा नदी काठच्या वझर सरकटे, भुवन, पोखरी केंधळे या रेती घाटावर रेती माफीयांनी धुमाकूळ घातला आहे. रात्रंदिवस येथून तलाठी व मंडळाधिकारी यांच्या सहकार्याने अवैध्य रेती उत्तखनन करून रेती तस्करी बिनादिक्कत सुरु आहे आहे.या अवैध्य रेती तस्करीला सहकार्य करणाऱ्या वझर सरकटे येथील मंडळ अधिकारी व तलाठी यांची तात्काळ बदली करा अशी मागणी वझर सरकटे ग्रामपंचायतचे सरपंच यांनी उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्याकडे निवेदनांद्वारे केली आहे

निवेदनात नमुद केले की, वझर सरकटे सज्जा चे ग्राम महसुल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्या सहकार्याने वझर सरकटे, भुवन, पोखरी केंधळे या तिन ठिकाणावरुन रात्रंदिवस अवैध रेती उत्खनन करून वाहतुक करण्यात येत आहे. कोणत्याही प्रकारच्या रेती उत्खनन व वाहतुक करण्यास परवाना नाही या बाबत सरपंच या नात्याने वरील प्रकार सुरु असल्याची वारंवार कल्पना दिली आहे परंतू सदरील संबधीत यंत्रणा याकडे जाणुन बुजुन दुर्लक्ष करीत आहे त्यामुळे सर्रास रेती वाहतुक होत आहे. त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना, नागरीकांना त्रास होत आहे. रात्रंदिवस भरधाव वेगाने रेतीचे वाहने जात आहेत त्यामुळे अपघाताचे प्रमाण वाढु शकते. सतत रेती वाहतुकीमधुन सतत धुळ उडत असल्यामुळे शेती पिकाचे नुकसान होत आहे. आज रोजी संबधीत यंत्रणा व रेती माफिया यांच्या संगणमताने रेती उत्खनन व वाहतूक चालू आहे परंतू सरपंच या नात्याने आपणास पूर्व कल्पना देणे माझे कर्तव्य आहे परंतू बीड सारखा प्रसंग माझ्यावर ओढावू शकतो आणि दुर्दैवाने तसे प्रकरण झाल्यास यास सन्माननिय तहसिलदार हे जबाबदार राहतील .तरी आपणास नम्र विनंती की, सदरील विषयी आपण आपल्या स्तरावरुन तात्काळ चौकशी करुन संबधीत यंत्रणेमधील मंडळ अधिकारी, तलाठी यांची तात्काळ बदली करावी नसता आपल्या कार्यालया समोर सदरील मागणी करिता सर्व गावकऱ्यासह उपोषण करण्यात येईल आसा ईशारा सरकटे यांनी निवेदनाच्या शेवटी दिला आहे निवेदनावर सरपंच सौ. सुनीता जितेंद्र सरकटे यांची स्वाक्षरी आहे.

# दिव्यांगांना फिरत्या वाहनावरील दुकानासाठी आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने सन २०२४-२५ साठी हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरत्या वाहनावरील दुकान (मोबाईल ऑन ई-व्हेईकल) मोफत उपलब्ध करुन देण्याबाबतची योजना लागू करण्यासंदर्भात शासन निर्णयानुसार मान्यता देण्यात आली आहे. या योजनेच्या अंमलबजावणीची कार्यवाही जालना येथील महाराष्ट्र दिव्यांग वित्त व विकास महामंडळ, मर्यादीत यांच्या स्तरावरुन सुरु करण्यात आली आहे. या योजनेला मिळत असलेला प्रतिसाद आणि मागणी लक्षात घेऊन गरजू दिव्यांग व्यक्तींना योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्जदार नाव नोंदणी करण्यासाठी पोर्टल https://register.mshfdc.co.in ही लिंक दि. १० फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ अधिकाधिक दिव्यांग व्यक्तींनी घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## मराठवाडास्तरीय शालेय पावर लिफ्टिंग स्पर्धा संपन्न

**सिंधीकाळेगाव -** विभागीय मराठवाडा स्तरीय शालेय पावर लिफ्टिंग स्पर्धा २०२४ २५ सह्याद्री हेल्थ क्लब येथे दिनांक चार आणि पाच फेब्रुवारी रोजी संपन्न. स्पर्धेचे उद्घाटन डॉ विशाल धानुरे यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून केडी फिटनेस झोनचे संचालक अर्जुन देवावाले किरण देशमुख अरुण पवार यांची उपस्थिती होती. स्पर्धेत प्रथम आलेले खेळाडू कुमारी धनश्री उबाळे कुमारी समीक्षा गायकवाड कुमारी श्रद्धा शिंगारे कुमारी त्रिशा यशाल कुमारी श्रुती देशमुख आदित्य मगरे बालाजी शेरे सम्यक गायकवाड उत्तम बाबर विठ्ठल कुटे सोमेश सिंग राजपूत सचिन गडगिळे सुंदर कहाते कृष्णा शेळके. विजयी खेळाडूंना डॉ विशाल धानुरे किरण देशमुख दीपक क्षीरसागर अरुण पवार अर्जुन देवावाले जितेंद्र राजपूत यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

## सहकार बँक कॉलनीत अखंड हरिनाम सप्ताह व भागवत कथा शुक्रवारपासून!

**जालना । प्रतिनिधी -** येथील सहकार बँक कॉलनीतील गजानन महाराज मंदिरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी प. पू. भगवान महाराज आनंदगडकर यांच्या कृपाशिर्वादाने अखंड हरिनाम सप्ताह, भागवत कथा व विजय ग्रंथ पारायण सोहळ्यास येत्या शुक्रवारपासून प्रारंभ होत आहे.

यां सप्ताहात शुक्रवार दि. १४ फेब्रुवारी रोजी हभप भगवान महाराज सावंत तर शनिवार दि.१५ फेब्रुवारी दिनेश महाराज उंडे (देवाची आळंदी), रविवार दि. १६ फेब्रुवारी रोजी हभप सोनवणे महाराज गुरुजी, सोमवार दि. १७ फेब्रुवारी रोजी राजेद्र महाराज वाघमारे आणि मंगळवार दि. १८ फेब्रुवारी रोजी हभप श्रीहरी रसाळ महाराज तर बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी हभप प्रा. उध्दव महाराज राऊत (आळंदी), गुरुवार दि. २० फेब्रुवारी रोजी हभप त्रिंबक महाराज दस्तापुरकर यांचे हरिकिर्तन होणार असून शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी रोजी हभप डॉ. भगवान बाबा आनंदगडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे. तर याच दिवशी तत्पूर्वी श्री. गजानन महाराज पालखी मिरवणूक (दिंडी) सोहळा होणार आहे.

यानिमित्त भरगच्च धार्मिक कार्यक्रम होणार असून दररोज सकाळी काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, श्री. गजानन विजय ग्रंथ पारायण, त्यानंतर गाथा भजन तर दुपारी १ ते ५ यावेळेत श्री. भागवत कथा होणार आहे. तर सायंकाळी हरिपाठ व रात्री ९ ते ११ यावेळेत हरिकिर्तन व त्यानंतर हरीजागर होणार आहे. तत्पूर्वी भागवत पुजन व समाप्ती महाआरती सौ. व श्री. सिमा शामराव भांदरगे यांच्या हस्ते होणार आहे. तर प्रगट दिनाचा महाप्रसादाचे मुख्य यजमान सौ. व श्री. सरिता दत्तात्रय शेजुळ हे राहणार असून भजनी मंडळ आणि किर्तन सेवेस साथ देणार आहेत मृदंगाचार्य हभप भगवान म. जाधव व तुकाराम म. मुढे, गायनाचार्य हभप हभप विष्णू म. सावंत हे ज्ञानेश्वर म. जोशी, भगवान म. लकडे, गिरी महाराज, रमेश प. पवार, यादव म. जाधव, उध्दव म. राठोड तर हरिपाठाचे नेतृत्व हभप विष्णू म. सावंत हे करणार आहे. या सर्व धार्मिक कार्यक्रमाचा पंचक्रोशीतील भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. गजानन महाराज विश्वस्त मंडळाचे सचिव श्री. सपंतराव पाटील व समस्त विश्वस्तांनी केले आहे.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.